गीत ః राधेकृष्णनाम

गायक ః स्वप्निल बांदोडकर

अल्बम ః तिच्या डोळयातलं गाव

गीत,संगीत ః अशोक पत्की

वृंदावनी सारंग हा का लावी  घोर जिवाला
झाली अशी वेडीपीशी कुणी जाऊनी सांगा त्याला
हा मंद गंध भवताली राधेला वाट गवसली
कधी झरझर पाण्यातुनी सुर सरु येती कानी
स स स प प प म म प ध म ग रे म प
राधेकृष्ण राधेकृष्ण नाम घे गवळण राधा

डोई वरती घागर घेऊनी जाई राधा नदी किनारी
हळुच कुठुनसा येई मुरारी बावरलेली होई विचारी
शब्द शब्द अवघडले परि नजरेतुनच कळले
आज ऐकण्या ती तान होई अधीर अधीर मन
स स स प प प म म प ध म ग रे म प
राधेकृष्ण राधेकृष्ण नाम घे गवळण राधा

गोड गोजिरी मूर्त सावळी प्रितीची तव रीत आगळी
म्हणती सारे आज गोकुळी राधामाधव नाही वेगळी
मनी चांदणे फुलते पाहुनिया अपुले नाते
कधी येणार येणार शाम रोखुनिया डोळी प्राण
स स स प प प म म प ध म ग रे म प
राधेकृष्ण राधेकृष्ण नाम घे गवळण राधा